महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३६५ वा | दिनांक : १९/१२/२०२५ | वार : शुक्रवार

## ठाकरेंची ही शेवटची निवडणूक : त्यानंतर त्यांच्याकडे कार्यकर्ते उरणार नाहीत, रावसाहेब दानवेंची



**जालना :** भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघाती टीका केली आहे. ही उद्धव ठाकरेंची शेवटची निवडणूक असून, यानंतर त्यांच्याकडे कार्यकर्ते उरणार नाहीत, असे भाकीत दानवे यांनी वर्तवले. तसेच माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यावरून सरकारची पाठराखण करताना त्यांनी सुप्रिया सुळे यांच्यावरही निशाणा साधला.

ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या चर्चेवर बोलताना रावसाहेब दानवे म्हणाले की, गेल्या महापालिका निवडणुकीच्या वेळी मी स्वतः भाजपचा प्रदेशाध्यक्ष होतो. त्यावेळी आम्ही एकत्र सत्तेत असल्याने युतीधर्मापोटी त्यांना महापालिका दिली होती. जर आम्ही त्यावेळी स्वतंत्र लढलो असतो, तर आमचाच महापौर बसला असता. आता परिस्थिती बदलली आहे, या निवडणुकीनंतर कार्यकर्ते स्वतःचे राजकीय भविष्य पाहून स्वतःचा मार्ग निवडतील, असे सूचक विधान त्यांनी केले.

सदनिका घोटाळा प्रकरणी दोषी ठरलेले आमदार माणिकराव कोकाटे यांच्याबद्दल बोलताना रावसाहेब दानवे म्हणाले की, कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही, हे आमच्या सरकारने सिद्ध केले आहे. कोकाटे यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून अजित पवार यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला आणि मुख्यमंत्र्यांनी तो स्वीकारला आहे. नवाब मलिक जेलमध्ये जाऊनही पदावर चिकटून राहिले होते, मात्र कोकाटे यांनी राजीनामा देऊन एक वेगळा आदर्श ठेवला आहे. कोकाटे प्रकृतीच्या कारणास्तव रुग्णालयात दाखल झाले असले, तरी जे झाले ते नियमानुसारच झाले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

धनंजय मुंडे आणि सुप्रिया सुळे यांच्यावर भाष्य धनंजय मुंडे यांचा मंत्रिमंडळात समावेश होणार का? या प्रश्नावर बोलताना रावसाहेब दानवे म्हणाले, हा निर्णय देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार घेतील, त्यावर मी भाष्य करणे योग्य नाही, असे ते म्हणाले. दरम्यान, सुप्रिया सुळे यांनी केलेल्या उपोषणावर त्यांनी टीकास्त्र सोडले. गेल्या 75 वर्षांत सुप्रिया सुळे कधी उपोषणाला बसल्या नव्हत्या, पण आता त्यांच्यावर अनेक वेळा उपोषण करण्याची वेळ येणार आहे, असा टोला दानवे यांनी लगावला.

## मुंबई हायकोर्टासह नागपूर, वांद्रे कोर्ट 'बॉम्ब'ने उडवण्याची धमकी

**मुंबई :** मुंबईतील उच्च न्यायालयासह वांद्रे, किल्ला कोर्ट आणि राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूरच्या जिल्हा न्यायालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी आज गुरुवार दिनांक १८ डिसेंबर रोजी देण्यात आली. या धमकीमुळे संपूर्ण राज्यात एकच खळबळ उडाली आहे. एका ई-मेलद्वारे ही धमकी देण्यात आल्याने पोलिस आणि सुरक्षा यंत्रणांची धावपळ उडाली असून, तातडीने न्यायालये रिकामी करून बॉम्बशोधक पथकाद्वारे (BDDS) कसून तपासणी सुरू करण्यात आली आहे.

मुंबई पोलिसांच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत वेबसाईटवर एक धमकीचा ई-मेल प्राप्त झाला. यात केवळ उच्च न्यायालयच नव्हे, तर 'मुंबईतील सर्व न्यायालये बॉम्बने उडवून देऊ', असा मजकूर होता. यात प्रामुख्याने वांद्रे आणि किल्ला कोर्टाचाही उल्लेख असल्याचे समजते. ही माहिती मिळताच परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, पोलिसांनी दुपारी एकच्या सुमारास तातडीने उच्च न्यायालयाची इमारत रिकामी केली. तसेच वांद्रे न्यायालयातही कामकाज स्थगित करून वकील, कर्मचारी आणि पक्षकारांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. अंधेरी न्यायालयात बॉम्ब असल्याची निनावी धमकी मिळाली. सुरक्षेच्या कारणास्तव तातडीने संपूर्ण न्यायालय परिसर रिकामा करण्यात आला. सध्या न्यायालयाच्या परिसरांना वेढा घालण्यात आला असून, आतून कोणालाही बाहेर जाण्यास आणि बाहेरून कोणालाही आत येण्यास मज्जाव करण्यात आला आहे.

मुंबईप्रमाणेच नागपूर जिल्हा आणि सत्र न्यायालयालाही सकाळी धमकीचा ई-मेल प्राप्त झाला. नागपूर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष रोशन बागडे यांनी सांगितले की, "सिव्हिल लाईन्स परिसरात असलेल्या न्यायालयाच्या इमारतीत दोन आरडीएक्स (RDX) आधारित स्फोटके पेरली असून लवकरच त्यांचा स्फोट होईल," असा दावा या मेलमध्ये करण्यात आला होता. यानंतर नागपूर पोलिसांनी तातडीने सुरक्षा वाढवून तपासणी मोहीम हाती घेतली. सुदैवाने अद्याप कोणतीही संशयास्पद वस्तू आढळलेली नाही.

सदरील धमकीचा ई-मेल नेमका कोणी पाठवला? त्याचा उद्देश काय? याचा शोध घेण्यासाठी मुंबई आणि नागपूर सायबर पोलिसांची पथके कामाला लागली आहेत. धमकीच्या मेलचे आयपी ॲड्रेस ट्रॅक करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. नागरिकांनी आणि वकिलांनी घाबरून न जाता पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

दोन आठवड्यांपूर्वी मिरा रोडवरील एका खासगी शाळेलाही अशाच प्रकारची बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती. दिल्लीतील कार स्फोटाच्या घटनेनंतर देशातील काही ठिकाणी अशा धमक्या मिळाल्या होत्या. १ डिसेंबर रोजी मिरा रोड येथील सिंगापूर इंटरनॅशनल स्कूलला सकाळी सहा वाजता बॉम्ब धमकीचा ई-मेल आला होता. त्यानंतर शाळेची बॉम्ब शोधक पथकाकडून तपासणी करण्यात आली होती, मात्र कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नव्हती.

## मंत्री संजय शिरसाट यांचा पाय खोलात : व्हिट्स हॉटेल प्रकरणाची 'हाय पॉवर कमिटी' मार्फत होणार चौकशी



**छत्रपती संभाजीनगर :** येथील विट्स हॉटेल (धनदा कॉर्पोरेशन) गैरव्यवहार प्रकरणाच्या चौकशीसाठी सरकारने एक हाय पॉवर समिती नियुक्त केली आहे. ही समिती या संपूर्ण प्रकरणाचा ८ दिवसांच्या आत तपास करून आपला अहवाल सादर करणार आहे. परिणामी, या प्रकरणी अडचणीत आलेल्या मंत्री संजय शिरसाट यांचा पाय आणखी खोलात गेल्याची चर्चा आहे. दरम्यान, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने या समितीच्या चौकशीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

मंत्री संजय शिरसाट यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील ११० कोटींचे सुप्रसिद्ध हॉटेल व्हिट्स अवघ्या ६८ कोटींत खरेदी करण्याचा कथित प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी टीकेची झोड उठल्यानंतर शिरसाट यांनी या सौद्यातून काढता पाय घेतला. पण आता या प्रकरणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती नेमल्यामुळे मंत्री शिरसाट यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. सरकारच्या परिपत्रकानुसार, प्रस्तुत समिती धनदा कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालमत्तेच्या लिलावामध्ये निविदा प्रक्रिया राबवताना त्यामधील अटी, शर्ती किंवा इतर प्रक्रियेत कुठे अनियमितता झाली आहे काय? याबाबत व सदर मालमत्तेच्या मूल्यांकनाबाबत सखोल चौकशी करणार आहे.

छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वातील या समितीत संभाजीनगरच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, सहसंचालक लेखा व कोषागारे, उपायुक्त कामगार विभाग, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सह जिल्हा निबंधक, सहाय्यक संचालक नगर रचना विभाग आदींचा सदस्य म्हणून समावेश आहे. या व्यतिरिक्त समिती अध्यक्षांना जे अधिकारी सदर समितीत आवश्यक वाटतील त्यांची नियुक्ती करण्याचे अधिकारही देण्यात आलेत.

सदर समितीला धनदा कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालमत्तेच्या लिलावात निविदा प्रक्रिया राबवताना त्यामधील अटी शर्ती किंवा इतर प्रक्रियेमध्ये कुठे अनियमितता झाली आहे काय? याबाबत व सदर मालमत्तेच्या मूल्यांकनाबाबत सखोल चौकशी अहवाल समितीच्या शिफारशी व अभिप्रायांसह तसेच आवश्यक कागदपत्रांसह ८ दिवसांच्या आत सादर करण्याचे निर्देश दिलेत. या पत्रकावर छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांची स्वाक्षरी आहे.

दुसरीकडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनी या समितीवरून सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ते म्हणाले, ज्या कार्यालयातुन विट्स हॉटेल (धनदा कॉर्पोरेशन) गैरव्यव्हार प्रकरणाच्या फाईली फिरल्या, त्याच कार्यालयांचे अधिकारीच आता या प्रकरणाची चौकशी करणार असल्याचा आदेश निघाला आहे. ही कसली 'हाय पॉवर कमिटी' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जी? हे तर प्रकरणावर स्पष्टपणे पांघरूण घालणे झाले!
वरिष्ठ, सचिव पदाचे सनदी अधिकारी किंवा न्यायाधीश या समितीचे अध्यक्ष आणि जिल्ह्याबाहेरील अधिकारी समितीवर नेमले असते तर आपल्यातील न्यायप्रिय मुख्यमंत्री दिसला असता. आता ही समिती निव्वळ देखावा आहे, असे ते म्हणालेत.

छत्रपती संभाजीनगर येथील हॉटेल व्हिट्स मूळ किंमतीपेक्षा कमी किंमतीत खरेदी करण्याचा आरोप मंत्री संजय शिरसाट यांचे सुपुत्र सिद्धांत शिरसाट यांच्यावर होता. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत व विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मंत्री शिरसाट यांच्यावर हे हॉटेल कमी किंमतीत विकण्यासाठी संबंधितांवर दबाव टाकल्याचा आरोप केला होता. तसेच हे हॉटेल खरेदी करण्यासाठी शिरसाट यांच्याकडे पैसे आले कुठून? असाही सवाल त्यांनी केला होता. या आरोपांनंतर संजय शिरसाट यांनी लिलाव प्रक्रियेतून माघार घेत असल्याची घोषणा केली होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ डिसेंबर २०२५

## विद्यार्थ्यांनी काळानुरूप शिक्षण घ्यावे! - प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे



**पाटोदा (प्रतिनिधी) :** आजच्या विद्यार्थ्यांनी काळानुरुप शिक्षण घ्यावे !असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांनी केले.ते पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयात आजिवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग आयोजित." विद्यार्थी समुपदेशन व व्यावसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या "उदघाटन सोहळयाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की जागतिकीकरणात बदलत्या काळात आपण स्वत:मध्ये बदल करून घेणे आवश्यक आहे.आवश्यक कौशल्य विकसीत करून आपले आयुष्य घडवावे !असे शेवटी विद्यार्थ्यांना अहवान केले.या कार्यशाळेचे उदघाटक म्हणुन श्री.शिवाजीराव पंडित महाविद्यालय,गढीचे प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन महिला महाविद्यालय,गेवराई चे प्राचार्य डॉ.तात्याराम सोंडगे हे होते.तर प्रमुख वक्ते म्हणुन प्रा.डॉ.संगीता आहेर,व प्रा.डॉ.दत्ता तंगलवाड ,प्रा. डॉ.कलंदर पठाण,प्रा.डॉ. सुनिल जाधव,आजिवन शिक्षण व निरंतर सेवा विभागाच्या समन्वयक प्रा.श्रीमती कल्पना घारगे,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा.प्रकाश नाईकवाडे, आदिची व्यासपीठावर उपस्थिती होती.या कार्यशाळेचे प्रस्तावीक प्रा.डॉ.कल्पना घारगे यांनी केले.उदघाटनपर भाषणात उदघाटक प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी सांगितले की परस्थिती नुसार विद्यार्थ्यांना नवनविन ज्ञान देण्यासाठी अशा कार्यशाळेचे आयोजन केले जाते.विद्यार्थ्यांनी या दोन दिवस चालणाऱ्या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे अहवान केले.प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.तात्याराम सोंडगे यांनी सांगितले की बदलत्या काळात कौशल्य विकसीत करणे गरजेचे आहे.काळानुरुप आवश्यक कौशल्य आत्मसात करावीत अशी अपेक्षा व्यक्त केली.या दोन दिवसीय कार्यशाळेत प्रथम सत्रात 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन 'या विषयावर प्रा. डॉ.दत्ता तंगलवाड तर, 'लेखन व संभाषण कौशल्य 'या विषयावर प्रा. डॉ.संगीता आहेर या मार्गदर्शन करणार आहेत तर द्वितीय सत्रात ' व्यक्तीमत्व विकास 'या विषयावर प्रा.डॉ.सुनिल जाधव व ' उद्योग व व्यवसाय ' या विषयावर उद्योजक श्री.संजय गव्हाणे यांची मुलाखत घेतली जाणार आहे.तरी विद्यार्थ्यांनी या दोन दिवसीय कार्यशाळेत सहभाग नोंदवून आपली कौशल्य विकसीत करावेत असे अहवान आजिवन शिक्षण व निरंतर सेवा विभागाच्या वत्तीने अहवान करण्यात आले आहे. या कार्यशाळेच्या उदघाटन सोहळ्याचे बहारदार संचलन प्रा.अशोक देवगुडे यांनी केले तर आभार या विभागाचे सदस्य प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी मानले.या उदघाटन सोहळ्याचे फेसबुक लाईव्ह प्रक्षेपण नाटककार प्रा.बापू घोक्षे यांनी केले.या प्रसंगी आदित्य भाकरे या भूमीपुत्राची भारतीय सैन्यदलात अधिकारी म्हणुन निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वत्तीने त्याचा व आईचा मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.या प्रसंगी मुख्याध्यापक श्री.एल.आर.जाधव,युवा नेते राहुल बामदळे व सर्व प्राध्यापक आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## ठाकरवाडीत बिबट्याचा वावर गावकरी भयभीत



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** निरगुडी बु ठाकरवाडी ता खुलताबाद परिसरात बिबट्याच्या संचाराने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असतानाच दिनांक १८ डिसेंबर रोजी पहाटे ३:३० वाजेच्या सुमारास बिबट्याने ठाकरवाडी या आदिवासी ठाकर वस्तीच्या भोरु पारधे ,रामभाऊ गावंडे यांच्या घराच्या पाठीमागे पायाने माती टापरून(उकरणे) आवाज करत असतांना हे ऐकून कुत्र्यांनी तिथून पळ काढला विशेष बाब म्हणजे गाई बकऱ्या बैल दारी बांधलेल्या असताना या बिबट्याने कोणत्याही प्रकारचे प्राण्यांना इजा हमला केला नाही बिपट्या हा वस्तीच्या शेजारून फिरत आहे त्यामुळे ठाकरवाडी या वस्तीतील लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे पावसाळ्यामध्ये बिपट्याच्या सोबत ३ पिल्ले फिरतांना पाहिलेले आहे त्यामुळे वन विभागाने या बिबट्यांचा बंदोबस्त करावा अशी चर्चा ठाकरवाडीतील लोकांमध्ये सुरू आहे.

## अय्युब पठाण यांना साहित्यरत्न पुरस्कार जाहीर



**(प्रतिनिधी)** पुणे येथील एस. फोर. सोल्युशन्सच्यावतीने आणि पुणे पुस्तक महोत्सवाचे औचित्य साधून २०२५ चा साहित्यरत्न पुरस्कार यंदा मराठवाडयाचे प्रसिध्द बालकवी तथा लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांना जाहीर करण्यात आला आहे. अय्युब पठाण हे मागील चाळीस वर्षापासून मराठी साहित्यक्षेत्रात सातत्याने भरीव लेखन करून आता पर्यंत त्यांचे पंधरा पुस्तके प्रकाशित असून बालभारतीच्या इयत्ता सहावीच्या इंग्रजी व हिंदी, इस.बी. एस. ई. माध्यमाला त्यांची " पाणपोई " ही कविता जून २०१६ पासून अभ्यासक्रमात समाविष्ठ आहे. तसेच अय्युब पठाण हे "बॅन्डमास्टर " असतांना त्यांनी १८ वर्षात साडेचार हजार वधू-वरांच्या लग्नात बॅन्डबाजा वाजवून समाजाचे मनोरंजन केले आहे. तसेच शिक्षक असतांना १५ हजार विद्यार्थी ३२ वर्षांच्या कालावधीत आपल्या प्रभावी अध्यापनातून घडविले आहे. तसेच सांस्कृतिक कार्यक्रम " मुले रंगली काव्यात " या एकपात्री उपक्रमातून १२७ प्रयोगातून विद्याथ्र्यामध्ये जनजागृती व प्रबोधनाचे कार्य केले आहे. अय्युब पठाण यांच्या अशा अजोड कार्याची योग्य दखल घेऊन पुणे येथील एस. फोर. सोल्युशनने त्यांना २०२५ चा साहित्यरत्न पुरस्कार जाहीर केला आहे.या पुरस्काराचे स्वरूप मानाची पुणेरी पगडी, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम असे असून लवकरच पुणे येथे मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार श्री.अय्युब पठाण लोहगावकर यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.

## सरपंच शिवराज भुमरे यांची कुस्ती आखाड्याला भेट



**छत्रपती संभाजीनगर :** संतश्रेष्ठ सदगुरू निपट निरंजन महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त साडेतीनशे वर्षापासुन यात्रा भरते त्या निमित्ताने भव्य कुस्ती दंगल आयोजित करण्यात येते विशेष म्हणजे राज्यभरातील भक्त समाधीस्थळी येतात गेल्या १५० वर्षांपासून हनुमान व्यायाम शाळा व निपट निरंजन महाराज यात्रा उत्सव समिती भव्य कुस्ती दंगल आयोजित करतात व राज्य आंतरराज्यातुन मल्ल कुस्ती खेळण्यासाठी येतात. कै. उस्ताद कुंदनलालजी डोंगरे त्यांच्या सहकाऱ्यांनी हि प्रथा चालू केली. १० पासून ते २,१००० हजार पर्यंत बक्षिसे देण्यात येतात पाचोडचे सरपंच मा.श्री शिवराज भैय्या भुमरे यांनी निपट निरंजन महाराज यात्रा व कुस्ती स्पर्धाला भेट दिली यात्रा उत्सव समिती अध्यक्ष. पंडीत साळुंखे उस्ताद डॉ. हंसराज डोंगरे पंच मंगेश डोंगरे उपाध्यक्ष

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ डिसेंबर २०२५


## मनपा शाळा-जिज्ञासा प्रकल्पाच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान प्रदर्शन



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा आयुक्त माननीय जी श्रीकांत सर यांच्या स्मार्ट स्कूल टू बेस्ट स्कूल या संकल्पनेतून तसेच शिक्षण विभाग प्रमुख माननीय श्री अंकुश पांढरे सर, शाळा समन्वयक गणेश दांडगे सर, शिक्षणाधिकारी साहेब भरत तीनगोटे सर, यांच्या प्रेरणेतून, आज मनपा प्राथमिक व माध्यमिक शाळा चिकलठाणा येथे विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन कार्यक्रम अधिकारी श्री ज्ञानदेव सांगळे सर, केंद्रीय मुख्याध्यापक श्री. चौधरी सर, मुख्याध्यापक श्री. प्रभाकर शिंदे सर यांचे हस्ते करण्यात आले . विज्ञान विभाग प्रमुख श्रीमती मनीषा शिंदे व अनुजा भिंगोले यांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांनी कल्पकतेतून नवनवीन विज्ञानाचे प्रोजेक्ट सादर केले. प्रोजेक्टचे परीक्षण श्री इरफान शेख सर यांनी केले. प्रदर्शनात प्रथम पारितोषिक समरीन शेख, द्वितीय पारितोषिक मनीषा उबाळे, तर तृतीय पारितोषिक गीता सोळुंके यांना मिळाले . मान्यवर व सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती बेबी मालोदे मॅडम यांनी तर आभार श्रीमती.अर्चना भारद्वाज मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री राठोड सर, वाघ सर, राजपूत सर, चव्हाण सर, सय्यद इरफान, जाहेद खान पठाण सर, सूर्यवंशी सर, श्रीमती .फुलंब्रीकर मॅडम, रंधे मॅडम, विद्या सासवड कवठेकर प्रोजेक्ट जिज्ञासा टीम चे सीमा डोंगरे मॅडम, शरद गवई सर, यांचे सहकार्य लाभले.

## उठ मित्रा

उठ मित्रा खूप झाले
रोजरोजचे रडगाणे
सिद्ध हो पुन्हा लढाया
वाजण्या तुझे नाणे

खूप लढाया हरला
युद्ध बाकी जिंकायचे
आला आहे जगी राजा
लढा देऊनी जायचे

खूप आले अन् गेले
विना लढताच मेले
लढणारे अमर झाले
बाकी काळाआड गेले

म्हणून तुला लढायचे
हरणे जिंकणे चालायचे
काळाच्या पडद्यावर
नाव कोरून जायचे



**ज्ञानेश्वर गायके**
कन्नड

## 'कवी मिर्झा बेग व बाबा आढाव हे अस्सल भारतीयत्वाचे प्रतिक' -प्राचार्य डॉ. आर. व्ही. मस्के




छत्रपती संभाजीनगर : "आपला भारत देश विविध जाती, धर्म, भाषा,प्रांत, रूढी परंपरांनी जसा नटला आहे तसाच तसाच तो मानवता व सामाजिक सद्भावासाठीही जगापुढे आदर्श ठरला आहे.याचे जिते जागते उदाहरण म्हणजे कवी मिर्झा बेग व सत्यशोधक डॉ.बाबा आढाव हे आहेत ,ते अस्सल भारतीयत्वाचे प्रतिक आहेत" असे गौरवोदगार प्राचार्य डॉ. आर व्ही मस्के यांनी आदरांजली सभेत काढले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात कवी मिर्झा बेग व सत्यशोधक डॉ. बाबा आढाव यांना आदरांजली वाहतांना महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी व प्राध्यापकवृंदांनी या थोर विभुतीबद्दल त्यांच्या जीवन कार्याविषयी विविध घटना , प्रसंगातून उजाळा दिला. कवी मिर्झा बेग यांच्या नर्मविनोदी शैलीतून साहित्य, संस्कृती व सामाजिक सद्भाव यासह जाती धर्म भाषा पेक्षा मानवतेचे महत्व विनोद , उपहास विडंबनातून सामान्य माणसाला श्रेष्ठत्व प्रदान केल्याचे मान्यवरांनी स्पष्ट केले , तसेच सत्यशोधक बाबा आढावांचे कार्य हे तळागाळातील वंचित उपेक्षित शोषितांच्या वेदना समजून देवदासी, हमाल , कष्टकारी मजूर ,असंघटीत कामगार महिला यांच्या हक्कासाठी त्यांनी केलेली आंदोलने, नामांतर लढा असो की राजस्थान उच्च न्यायालयातील मनूचा पुतळा आंदोलन, हमाल , स्वच्छतकामगार महिलांना आत्मभान देतांना पुरोगामी सत्यशोधक बनून खऱ्या लोकशाहीचे, जागरूक भारतीयत्वाचे अस्सल आदर्श ते बनले, बोलक्या सधारकांपेक्षा कर्ते सुधारक बनून कृती कार्य व विचारातून त्यांनी आदर्श निर्माण केल्याची भावना डॉ. शुभम गायकवाड, डॉ. सुनील सोनवणे,डॉ. रेश्मा गरड , डॉ. संजय खरात, डॉ. संघरत्न गवई, डॉ. अशोक केवटे, डॉ. सुरेखा खरात , डॉ. संदिप गवई , डॉ. गौतम घाडगे यांनी आपल्या विचारातून थोरांना मानवंदना दिली. यावेळी उपप्राचार्य प्रा.एन.एम. करडे यांनी विद्यार्थ्यांपुढे कवी मिर्झा बेग व सत्यशोधक बाबा आढाव यांचा वैचारिक वारसा जपण्याचे आवाहन केले. आदरांजली सभेचे सूत्रसंचालन प्रा नवनाथ गोरे यांनी केले आभाळाची आम्ही लेकरे व अखंड गात थोरांना अभिवादन करून सभेची सांगता झाली. अभिवादनास महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी व प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

# मार्टिन लूथर किंग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक न्यायाचा संघर्ष

१९ डिसेंबर हा दिवस सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि समानतेसाठी झटणाऱ्या विचारपरंपरेची आठवण करून देणारा दिवस आहे. या दिवशी जन्मलेले मार्टिन लूथर किंग सीनियर हे अमेरिकेतील वर्णद्वेषविरोधी लढ्याचे नैतिक अधिष्ठान मानले जातात. दुसरीकडे, भारतीय समाजव्यवस्थेतील जातीआधारित विषमतेविरुद्ध आयुष्यभर संघर्ष करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताच्या सामाजिक न्यायाच्या विचारांचे शिल्पकार ठरले. भौगोलिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या भिन्न असलेल्या या दोन महान व्यक्तिमत्त्वांचे जीवनकार्य समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले असता, त्यांच्यातील साम्य अधिक ठळकपणे समोर येते. दोघांनीही वेगवेगळ्या सामाजिक संरचनांमध्ये जन्म घेतला, परंतु दोघांच्याही संघर्षाचे मूळ एकच होते. मानवी प्रतिष्ठेचा अपमान करणाऱ्या अन्यायकारक सामाजिक व्यवस्थेचा निःसंकोच प्रतिकार करणे.अमेरिकेतील कृष्णवर्णीय समाज आणि भारतातील दलित समाज, या दोन्ही समुदायांचा इतिहास दडपशाही, वंचना आणि अपमानाने भरलेला आहे. अमेरिकेत गुलामगिरी, वर्णभेद आणि विभक्तीकरणाच्या धोरणांमुळे कृष्णवर्णीय समाजाला शिक्षण, रोजगार, निवास आणि राजकीय हक्कांपासून दूर ठेवण्यात आले होते. भारतात जातिव्यवस्थेने दलित समाजाला अस्पृश्यतेच्या नावाखाली सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक आयुष्यापासून बहिष्कृत केले. समाजशास्त्र सांगते की अशा प्रकारची विषमता ही केवळ वैयक्तिक पूर्वग्रहांमुळे निर्माण होत नाही, तर ती संपूर्ण सामाजिक रचनेतून, परंपरा, कायदे आणि सत्तासंबंध यांमधून घडवली जाते. किंग सीनियर आणि आंबेडकर दोघांनीही ही संरचनात्मक विषमता ओळखली आणि तिच्या मुळावर प्रहार करण्याचा प्रयत्न केला.मार्टिन लूथर किंग सीनियर हे धर्मोपदेशक होते. त्यांनी चर्च या संस्थेला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनवले. चर्चमधून त्यांनी आत्मसन्मान, समता आणि नैतिकतेचे संदेश दिले. त्यांच्या मते धर्म हा केवळ वैयक्तिक मोक्षाचा मार्ग नसून तो सामाजिक न्यायाचा आधार असला पाहिजे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, त्यांनी धर्माचा वापर 'सामाजिक एकजूट' आणि 'नैतिक दबाव' निर्माण करण्यासाठी केला. त्याउलट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्माकडे अत्यंत चिकित्सक दृष्टीने पाहिले. त्यांनी हिंदू समाजातील जातिव्यवस्थेचे धार्मिक समर्थन उघडपणे नाकारले आणि धर्मग्रंथांवर आधारित अन्यायाला आव्हान दिले. त्यांनी कायदा, संविधान आणि राजकीय अधिकार यांना सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या दोघांच्या मार्गांमध्ये फरक असला, तरी त्यांचा उद्देश एकच होता तो म्हणजे दडपल्या गेलेल्या समाजाला आत्मसन्मान आणि हक्क मिळवून देणे.शिक्षण हे सामाजिक मुक्तीचे साधन आहे, यावर दोघांचाही ठाम विश्वास होता. किंग सीनियर यांनी कृष्णवर्णीय समाजात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आणि चर्चच्या माध्यमातून बौद्धिक जागृती घडवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तर शिक्षणालाच सामाजिक क्रांतीचे मुख्य शस्त्र मानले. "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हा त्यांचा संदेश समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, सामाजिक चळवळीची मूलभूत सूत्रे मांडणारा होता. शिक्षणामुळे व्यक्तीला केवळ ज्ञान मिळत नाही, तर ती सामाजिक रचनेतील अन्याय ओळखण्याची क्षमता प्राप्त करते, हे दोघांनाही स्पष्टपणे जाणवले होते.अहिंसा आणि नैतिक प्रतिकार हा किंग सीनियर यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता. त्यांनी हिंसेपेक्षा नैतिक बळ अधिक प्रभावी ठरते, असा विश्वास समाजात रुजवला. समाजशास्त्रात अहिंसा ही 'नैतिक वर्चस्व' निर्माण करण्याची प्रक्रिया मानली जाते, जी सत्ताधाऱ्यांवर दबाव टाकते. बाबासाहेब आंबेडकर यांचा मार्ग मात्र अधिक संघर्षात्मक होता. त्यांनी शांततापूर्ण आंदोलनांसोबतच तीव्र शब्दांत सामाजिक व्यवस्थेवर टीका केली. त्यांनी कायदेशीर लढा, आंदोलन आणि राजकीय सहभाग यांचा मार्ग स्वीकारला. तरीही, दोघांचाही उद्देश हिंसक अराजक नव्हता, तर न्याय्य आणि सन्मानजनक समाजनिर्मिती हाच होता.कुटुंब आणि समाजीकरणाच्या प्रक्रियेलाही दोघांनी महत्त्व दिले. किंग सीनियर यांनी आपल्या कुटुंबातूनच समतेचे, नैतिकतेचे आणि सामाजिक जबाबदारीचे संस्कार रुजवले. समाजशास्त्रात कुटुंब ही प्राथमिक समाजीकरणाची संस्था मानली जाते, आणि त्यांच्या कुटुंबातून पुढे जागतिक स्तरावरील नेतृत्व घडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैयक्तिक आयुष्य संघर्षाने भरलेले असले, तरी त्यांनी समाजाला नवे संस्कार देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी दलित समाजाला आत्मगौरव, संघटन आणि राजकीय जागृतीची दिशा दिली.दोघांच्याही संघर्षात संघटनाला अनन्यसाधारण महत्त्व होते. किंग सीनियर यांनी विविध धार्मिक आणि सामाजिक गटांना एकत्र आणून सामाजिक भांडवल निर्माण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजाला संघटित करून त्यांना राजकीय शक्तीची जाणीव करून दिली. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, संघटन हीच सामाजिक परिवर्तनाची खरी ताकद असते. एकटा व्यक्ती अन्यायाविरुद्ध उभा राहू शकतो, पण संघटित समाजच परिवर्तन घडवू शकतो, हा संदेश दोघांनीही आपल्या कृतीतून दिला.आजच्या जागतिक आणि भारतीय संदर्भात किंग सीनियर आणि आंबेडकर यांचे विचार अधिकच समर्पक वाटतात. आजही जगभरात वंश, जात, धर्म, लिंग आणि वर्ग यांच्या आधारावर भेदभाव अस्तित्वात आहे. कायदे आणि संविधान असूनही सामाजिक विषमता पूर्णतः नष्ट झालेली नाही. समाजशास्त्र सांगते की अशा परिस्थितीत मूल्यपरिवर्तन आणि नैतिक नेतृत्व अत्यंत आवश्यक असते. किंग सीनियर यांचा नैतिकतेवर आधारित संघर्ष आणि आंबेडकर यांचा कायदेशीर व बौद्धिक लढा, हे दोन्ही मार्ग आजच्या समाजाला दिशा देऊ शकतात.१९ डिसेंबर रोजी मार्टिन लूथर किंग सीनियर यांच्या जयंतीनिमित्त, त्यांच्या विचारांचा विचार करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाच्या संघर्षाशी त्यांची तुलना करणे अत्यंत अर्थपूर्ण ठरते. दोघांनीही वेगवेगळ्या देशांत, वेगवेगळ्या सामाजिक वास्तवांतून एकच संदेश दिला तो म्हणजे माणूस म्हणून माणसाला समान हक्क आणि समान सन्मान मिळालाच पाहिजे. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहता, हे दोन्ही विचारवंत केवळ इतिहासातील व्यक्ती नाहीत, तर ते आजही जिवंत असलेले सामाजिक विचार आहेत.शेवटी, मार्टिन लूथर किंग सीनियर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य हे मानवी प्रतिष्ठेच्या संरक्षणासाठी चाललेल्या जागतिक संघर्षाचे प्रतीक आहे. दोन खंडांमध्ये जन्मलेले, दोन वेगवेगळ्या समाजव्यवस्थांशी झुंज देणारे हे नेते एकाच ध्येयासाठी उभे राहिले ते ध्येय म्हणजे न्याय, समता आणि बंधुता होय. त्यांच्या विचारांचा वारसा स्वीकारणे म्हणजे केवळ स्मरण करणे नव्हे, तर त्यांच्या मूल्यांना आपल्या सामाजिक आचरणात उतरवणे होय. कारण समाज टिकवायचा असेल, तर तो न्यायावर आणि मानवी प्रतिष्ठेवरच उभा राहिला पाहिजे, आणि हीच शिकवण किंग सीनियर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर दोघांनीही मानवजातीला दिली आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ डिसेंबर २०२५

# चक्रव्यूह : गावं माणसांचे मर्मग्राही चित्रण




मंठा येथील डॉ रमेश पंडितराव बोराडे यांचा'चक्रव्यूह' हा ग्रामीण कथासंग्रह,म्हणजे 'आजच्या समकालीन वास्तवाचे मर्मग्राही चित्रण.आजच्या वास्तवाचे गावं गावात राहिले नाही.साऱ्यांच्या हातात मोबाईलधारी शस्त्र आले.आणि माणूस माणसापासून दुर गेला.नाते संमध दुरावले, जिव्हाळा, आपुलकी, माणुसकी ह्या गोष्टी पारख्या झाल्या परक्या झाल्या आणि सुरू झाला बांगडबल्ली 'चक्रव्युह'.या काळ्याकुट्ट नीतीचा पिच्छा पुरवत तिची चांगलीचं जिरवतं ही कथा चक्रव्यूह तोडते.या कथेच्या आशय संपन्नतेने प्रस्तावना लिहितांना साक्षेपी समीक्षक डॉ धोंडोपंत मानवतकर लिहितात "कृषकांसह समग्र ग्रामसमष्टीच्या जिव्हाळा अस्मितेतील जाणिवेचे जगलेपण म्हणजे लेखकाच्या स्वानुभूतीतून प्रतिबिंबीत झालेल्या लोकमनाचे हे यथार्थ कथा संचित होय."(पृ.सात)ही समग्र ग्रामसमष्टीची कथा व्यापक संकेत देतच आली आहे.ही शाबासकीची थाप आणि एक स्वतंत्र समग्र ग्रामीण कथाकाराची धिरोदत सदिच्छा ही दिल्या आहेत.कथा नायक कथेतील मध्यवर्ती पात्रे.त्यातील संवाद.त्यातून कथासुत्र सरकत कथेतील नायकांच्या कथेचा आत्मा मांडने.तसे मका आणि डुक्करांची टोळी मकाची नासाडी करणार,सदा फरशी कुऱ्हाड, सुतळी फटाके वाजवायचे.डुक्करं भंयकर चवताळले होते सदाच्या पोटरीचा चावा घेतात.मकाची डुक्कर पासून बचाव करण्यासाठी केलेला हा चक्रव्यूह.कथेकरी बुवांनी सांगितलेली महाभारतातील कथा.ही आजच्या समकालीनात शेतकऱ्यांना सुध्दा या चक्रव्यूहाला सामोरे जावे लागते.'बटाई-ठोका' या कथेतील नायक जगुमामा.बटाई खाई खटाई.बारभाईची मिठाई.आज विश्वास राहिलेला नाही बेईमानी नसानसात घुसली.इथं आता ठोक्याने जमीन कसायला द्याव तिथं इमानदारी राहिली नाही.त्यात सरकारी अनुदानाचा बोऱ्या वाजलेला.तलाठ्याशी संगनमत करून सातबाराचं बदला.ज्या तहसीलदार पुढं फोटो काढला.त्याचं काय झालं?यात जगुमामाच्या वाट्याला आलेल्या दुःखाचे चित्रण येते.'मुकाक्रोश' या कथेतील भानु त्याची बायको व दोन मुलं त्यांच्या बायका.सक्कया मायीला न विचारणारे पोरं,सुना ही तशाचं .भानु बायकोच्या गळ्यातील डोरल विकुन पैशाची तडजोड करतो.गाडीत टाकून तालुक्याच्या दवाखान्यात घेऊन जाऊ.भर पाऊसात आटापिटा करतो.रंगबाई रातीचं मरून पडते.भानुभाऊ मुका होतो."मायघाल्यानो! आता रडता का?तुमची माय मेली नाही तुमी मारली संमद्यायनं मिळूनं, हे घ्या पंधरा हजार रूपये. पोरांच्या अंगावर उधळतो."(पृ ५३)ही आजच्या समकालीन वास्तवाची भेदक कथा.गढ्या ढासळल्यापिढ्या नासलेल्या. "भाऊबंद" अंकुशनं आपले भाऊ लहानचे मोठे केले शिक्षण केले.वाटणीच्या नादात सख्खे भाऊ पक्के वैरी कसे झाले.बापाजाद्याची जमीन व नोकरीवाल्याने केलेली मदतत.सोयरे जेव्हा मधी पडतात.जमीन जुमला जायजाद पाहुच पोरगी दिली होती.भाऊ हिशाची ही कथा मनाला उद्विग्न करून जाते.आज एकत्र कुटुंब राहिले नाही.साराचं वासू देव्हारा झाला आहे."हरफन मौला" सोपान काका एक अवलिया माणूस तो अनेकांच्या सोबत राहतो.आजच्या वास्तवात सरपंच,चेअरमन ते आमदार खासदार यांची ओळख पण काम कोणतेच केले नाही.असे हे हरफन मौला "कोन सुख धारोनाराहो सांग मज बा हरीअवघ्या नाशिवंता परीतिला दुरी अंतरसी"(पृ ८३) लोकं पैसा पैसा करून मरतात.पण सुख लाभत नाही माणसाने आपल्या मनमुक्त विचारांने जगले पाहिजे."संसार माय"ही एक अफलातून साधूची गोष्ट.ज्या गावात साधु आले प्रोफेसर आहेत.धनसंपती सारे टाकून इथे आले.त्यांना बायको पोरं आहे.पण त्यांच्या नावाची संपत्ती त्यांनी कुणाच्या नावावर केली तर?त्यांची बायको त्यांच्या शोधात या गावांत येते.या गावातून हा साधू निघून जातो.पण या गावात दुसरा साधू येतो.तो गावातील बबन असतो.सहलीला जायचे म्हणून बापाला पैसे मागणारा.बापाने मुटकूळा होईस्तोवर मारले.तो गाव सोडून पळून गेला.चाळीस वर्ष झाले.गावं लोकं सारं विसरले.हा साधू रामायण कथा सांगून भक्तीमय दर्शन घडवायचा.हा इथे आला तो केवळ आपल्या आईचं दर्शन घडावे.मी जिवंत आहे.सन्याशी झालो.त्याचा भाऊ आई यांना तो गुपचूप भेटतो ओळख देतो.कपाळावरची खोच मुळे हा आपला बबनच आहे.ही खात्री पटते.पण त्याच्या भावाची बायको निम्म्यानं राती नवऱ्याला सोबत घेऊन बबन महाराजला म्हणते "तुम्ही वावरात,घ्या दारात हिसा माघयला आले काय?फुटकी कवडी भेटणार नाही.म्या गावात तुमची बोंब करीनं..बबन महाराज म्हणतात.चला रामायण कथा संपून गावात महाभारत सुरू व्हायच्या आत इथून सटका...या मोह माया पासून दुर गेलेल्या मनाची कथा मनाला चटका लावून जाते."वंशवेल"ही वास्तवतेचा अग्याडोंम करते.आज सर्वहारा समाजात लग्नाला मुलीचं भेटत नाही.विस वर्षांपूर्वीचं या मुली गर्भात मारुन टाकल्या आहेत.सुशिक्षित बेकार मुले झाली आहे सारेचं पुणे मुंबई येथे रोजंदारीवर काम करून खोटे बायोडाटे दाखवता आहेत.ज्या घरात मुलगी दिली.तिला हुंडाबळी केले.तिच्या बापाला मरणान यातना भोगल्या.हे वास्तव आहे.आज प्रत्येक गावात दहाबारा मुले लग्नाचे वय होऊन गेले पण कुणीच संड्याला मुलगी देतं नाही.वंशवेल या कथेत बापाचं मुलाला म्हणतो तू मुंबईला जाऊन तिकडेच मुलींबरोबर लग्न करं.वंशवेल वाढला पाहिजे.ही आजच्या समकालीन वास्तवाची भेदक कथा आहे."अण्णाची सेवानिवृत्ती" हे गावाकडे आले तेंव्हा त्यांना घरभेदी लोकांचा त्रास झाला.सतत शेतीच्या कामासाठी पैसे पुरवाणारे आण्णा. आपल्याच माणसांकडून दुखवले जातात इथल्या माणसाने शेती मातीशी इमान ठेवले नाही.बेइमानी मनांत घुसली.सेवानिवृत झाले आण्णा आणि त्यांच्या पैशावर,घर संपत्तीवर असलेला डोळा शेवटी ते म्हणतात मला हे बापाजाद्याचं जमीन जुमला काहीही नको.सारं भावाला देऊन ते संभाजीनगरला जातात.अशी कृतघ्न मालकीची कवी फोडणारी अवल्याद निघाली."कुंता"ही कथा नायिका अतिशय खंबीर पतीचा अपघात झाला.त्याला वाचवण्यासाठी तिने संघर्ष केला. डॉ म्हणून तीची कहाणी अतिशय दर्दभरी आहे.हा नवरा एका बाईने कसा पळून नेला.पुण्याला कसा विकला.कुंताने तडजोड करून त्याला सोडून आणला.हा दारूड्या नवरा एक दिवस मरतो.कुंता जगत राहते जगवत राहते. 'ईलास, भरू नको गिल्लास नहीत व्हशीन खल्लास'(पृ.१६३) काळाच्या ओघात कुंता गाव सोडते.प्रवासात एक हॉटेलसमोर एका बिऱ्हाड सोबत ती बसलेली असते. डॉ. तिला ओळखतात ती ओळख देते.तीला सासू सासऱ्यांनी काढून दिले.तिचा मुलगा आणि ती लढते आहे.जगते आहे.कुंता ही कथा एका स्त्रीची जगण्याची चिवट कथा आहे.कथाकार रमेशराव बोराडे यांच्या कथेला एक सृजनशील चिंतनाची डुब आहे.आजच्या गावं खेड्यातील माणसं आज भय्यान जीवन जगता आहेत.गेल्या कित्येक दिवसांपासून डुक्करं,हरणं अन् आता बिबट्या या मुळे शेतकरी या चक्रव्यूहात अडकला आहे.त्यात राजकीय नीतीच्या चक्रव्यूहाने तोव्यसनाधीन झाला आहे.मलपृष्टावरील चिंतनाची पाठराखण साक्षेपी समीक्षक डॉ धोंडोपंत मानवतकर सरलिहितात "कथा आणि कादंबरी लेखनप्रकार तसा जिकिरीकीचाच असून कथा लेखकाला भूत, भविष्य, आणि वर्तमानाचे भान ठेवूनच लेखन करावे लागते.त्याला सापडलेले कथाबीज जितके महत्त्वाचे असते त्यापेक्षा त्या कथाबीजाचा विस्तार तेवढाच महत्त्वाचा असतो.त्याहुन ही त्या कथेच्या विस्तारभयाचे भान ही लेखकाला असावे लागते.ते भान कथाकार रमेश बोराडे यांनी ते जपले आहे.त्यांच्या सर्वच कथा वास्तव घटनांवर आधारित आहेत."ही अतिशय लक्षवेधी पाठराखण आहे.कारण रमेश बोराडे यांनी साहित्य लेखनातील सातत्य टिकून ठेवल्यास ते उद्याचे पिढीतील प्रथितयश कथाकार कादंबरीकार असतील यात शंका नाही.अशा माझ्याही मनस्वी हार्दिक शुभेच्छा!



**पुस्तक परिचय**
**डॉ प्रभाकर शेळके,**
जालना

# डाळींबाचे दाणे

डाळींबाचे दाणे
गुलाबी लाल
पाहून फुलतात
पोपटाचे गाल

औषधी गुणधर्म
डाळींबात भरपूर
अनेक आजार
पळती दूर

टपोरे दाणे पाहून
हरपते भान
देवबाप्पाने केली
पॅकिंग छान

डाळींबाच्या भोवती
काटेच काटे
आतमध्ये जणू
माणिकांचे साठे

बहुगुणी डाळींब
पौष्टिक भरपूर
निरोगी आरोग्यासाठी
खावे जरूर



• **रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १९ डिसेंबर २०२५

# कृषी संस्कृतीचा उत्सव : वेळ अमावस्या (येळवस) परंपरा आणि अर्थ



**भा**रतीय संस्कृतीत उत्सवांना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. विशेषतः मातीसाठी अहर्निश काम करणारा शेतकरी,शेतमजूर(अलुतेदार-बलुतेदार) यांच्याकडून जे सण साजरे केले जातात, त्या सणाची ओळख राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय पातळीवर मात्र फारशी झाली नाही. विशिष्ट भागात, विशिष्ट दिवशी, विशिष्ट पद्धतीने व विशिष्ट आहारासह एकत्रितपणे आनंदाने साजरा केला जाणारा महाराष्ट्र-कर्नाटक व तेलंगण सीमावर्ती भागातील 'वेळ अमावस्या' हा केवळ सणचं नव्हे;तर एक प्रकारचा उत्सव आहे. हा उत्सव काही भागापुरता मर्यादित असला तरी शेजारधर्म पाळणारा आणि मातीशी नाळ घट्ट ठेवणारा आगळावेगला असा उत्सव आपणास इतरत्र कोठेही पाहायला मिळत नाही. कृषी संस्कृती ही मुळात मातीशी व भारतीय संस्कृतीशी एकरूप झालेली आहे. त्यामुळे अशा उत्सवाच्या माध्यमातून मातीविषयी व संस्कृतीविषयी शेतकरी कृतज्ञताचं व्यक्त करीत असतात.

विशेष संकल्पना: भज्जी,आंबिल,हेंडगा

'वेळ अमावस्या' हा उत्सव (सण) ग्रामीण भागात 'येळवस' या नावाने देखील ओळखला जातो.पौष महिन्यात अमावस्या रोजी विशेषत: डिसेंबरच्या शेवटच्या पंधरवड्यात तर कधी जानेवारीच्या सुरुवातीच्या पंधरवड्यात हा सण येतो.जूनच्या पेरणीनंतर सातव्या अमावस्येला हा उत्सव साजरा केला जातो. कन्नडमध्ये 'येळ' म्हणजे सात. त्यावरून 'येळवस' असे म्हटले जात असावे.कन्नडमध्ये तिळा ला 'येळू'(डब्बल 'ळ') म्हणतात. या दिवसापासून दिवस तिळातिळाने वाढतो. म्हणून या उत्सवाला 'येळवस' असे म्हटले जात असावे.येळ्ळू अमावस्येचा हा अपभ्रंश झाला आहे. मुळात 'वेळ अमावस्या' हा मराठीतला शब्दच नाही. या सणाला बोलीभाषेत 'वेळ अवस' 'येळ अमोशा' असे देखील म्हटले जाते. भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जात असल्यामुळे या देशात शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांची संख्या अधिक आहे. त्यामुळे पोळा, रब्बीतील पेरणीचे मोडं वर आल्यानंतर दहा ते पंधरा दिवसात पांढरहिटू(कन्नड शब्द),संक्रांत व वेळ अमावस्या असे लहान-मोठे सण की जे मातीशी नाळ जोडणारे आहेत. जी काळी आई आपल्याला जगवते,त्या आईची पूजा करून ऋण व्यक्त करावे, या उद्देशाने हे सर्व उत्सव साजरे केले जातातवेळ अमावस्या हा उत्सव महाराष्ट्रात विशेष करून लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.मुळात हा सण कर्नाटकातला असता तरी मराठवाड्यातील बीड,लातूर, उस्मानाबाद व पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर तसेच तेलंगण सीमाभागातील जहिराबाद, निजामाबाद व आदिलाबाद या परिसरात काही प्रमाणात वेळ अमावस्या साजरा केली जाते.तसे पाहिले तर संपूर्ण कर्नाटकात हा सण सीमावर्ती भागात ज्या प्रकारे साजरा केला जातो,तसा साजरा केला जात नाही. उत्तर कर्नाटकातील गुलबर्गा, विजापूर तसेच बिदर जिल्ह्यातच अधिक प्रमाणात हा सण साजरा केला जातो.लातूर जिल्ह्यात तर हा सण वैशिष्ट्यपूर्ण असाच आहे. अनेकदा स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी यांच्याद्वारे स्थानिक सुट्टी जाहीर केली जाते. सकाळी दहा ते सायंकाळी पाचपर्यंत एका अर्थाने शहरात व ग्रामीण भागातही एकप्रकारे अघोषित बंदीचं असते. गाव आणि रस्ते निर्मनुष्य झालेली असतात.सर्व दुकाने व बाजार बंद असतो जवळपास दिवसभर कोणीही दुकाने उघडत नाहीत.पिकांच्या आणि माणसांच्या गर्दीने शेत-शिवारला बहर येतो. घरातील लोक शिक्षण, नोकरी व व्यापाराच्या निमित्ताने कितीही दूर असले, तरी ते गावाकडे येण्याचा प्रयत्न करीत असतात. शेजारी,मित्रपरिवार,बलुतेदार आलुतेदार, व्यापारी,कामगार व काही ठिकाणी विध्यार्थी या सर्वांना निमंत्रण त्या दिवशी आग्रहाने,प्रेमाने दिले जाते. विशेषत: ज्यांच्याकडे शेती नाही, जे दुसऱ्या गावात स्थायिक झालेले आहेत,ज्यांचे गाव दूर आहेत अशांना तर आवर्जून शिवार भोजणासाठी निमंत्रण दिले जाते. एवढेच नाही तर रस्त्यांने जाणारे ट्रक व बसेस चालक व वाटसरू हे परिचयाचे नसले तरी त्यांनाही प्रेमाने भज्जी खाण्यासाठी आग्रह केला जातो. 'या आमच्या कोपीत भज्जी खायला' असे एकमेकांशी म्हणून बोलविले जाते. एकमेकांकडे हा उत्सव साजरा केला जात असला तरी एकमेकांना निमंत्रण देऊन शेतात बोलावले जाते. भोजनानंतर काही ठिकाणी पानाचा विडा देखील दिला जातो.लेकीला माय ज्या भावनेतून पाठविते,त्याच भावनेने भोजनानंतर आलेल्या मित्रांना, पाहुण्यांना पाठविले जाते. असे या सणाचे वेगळेपण म्हणून नोंदविता येईल.

शेतात रब्बीची पिके जेव्हा बहरलेली असतात तेव्हा वेळ अमावस्या हा सण येतो. ज्वारी, हरभरा, गहू, मिरच्या वठाणे भाजीपाला इत्यादी पिके या दरम्यान आलेली असतात. एखाद्या वर्षी दुष्काळ असो, उत्पन्नामुळे फायदा किंवा तोटा होवो या परिसरात शेतकरी मात्र मोठ्या आनंदाने वनभोजनासाठी लोकांना निमंत्रण देतात. त्या दिवशीचा त्यांचा आनंद गगनात मावेनासा असाच झालेला असतो.

ज्या दिवशी हा सण असतो, त्या दिवशी सकाळी सात पासून नऊ पर्यंत शेतकरी साहित्य घेऊन शेतात जातात. पूर्वी सगळेच बैलगाडीने जायचे.आता वाहनामुळे,यंत्रयुगामुळे बैलगाडीचे प्रमाण कमी झाले आहे. आज बैलगाडीची जागा दुचाकी गाडी,ट्रॅक्टर,टेम्पो व कार इत्यादीने घेतली आहे. शेतात पाच कडब्याच्या पेंड्या उभे करून 'कोप' तयार केली जाते. ही कोप म्हणजे आधार व सावलीचे प्रतीक होय.पांडव लक्ष्मीला दैवत मानून पूजा केली जाते. कोपीवर एखादी शाल किंवा स्त्रियांच्या वलीने झाकले जाते. कोपीच्या आत सारवून घेऊन मातीच्या लक्ष्मीची मूर्ती तयार करून बसविली जाते. पांडवाची मूर्ती मातीपासून करून किंवा दगडाचे ठेवले जाते. लक्ष्मीची व पांडवाची पूजा करण्यासाठी मातीचे पाच मडके, फुलं बोरं,पेरू,गाजर,केळी यांचा उपयोग करून नैसर्गिक पद्धतीने पूजाविधी केला जातो. बळीराजा जोडीने पूजा करून कोपीच्याभोवती 'ओलगे ओलगे सालम पलगे' म्हणत फेऱ्या मारतो. पुढे असणारा 'वलगे वलगे' तर मागील व्यक्ती 'सालम पलग्या' म्हणत दोन ते पाच फेऱ्या मारतो.काही परिसरात 'हर हर महादेव येळकोट येळकोट घे' 'घट्ट द्या पातळ घ्या'असे म्हणत कोपीच्या भोवती फेऱ्या मारले जाते. एकाच्या हातात पाणी तर दुसऱ्याच्या हातात आंबिल असते. या कानडी शब्दाचा अलीकडच्या काळात अपभ्रंश झालेला असावा. 'वांग्याची भाजी आणि पोळी तुम्हाला देतो, तुम्ही आम्हाला चांगली पिकं द्यावीत व आम्हाला समृद्ध करावं' असा याचा भावार्थ आहे. यासंदर्भात महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगण सीमाभागातील काही वृद्ध व संस्कृतीच्या जाणकारांशी चर्चा केली.पण समाधानकारक उत्तर मात्र याचे मिळाले नाही. हे परंपरेने चालत आलेले आहे. म्हणून आम्ही देखील तसेच म्हणतो,असे अनेकांना वाटते. मुळात हे कानडी वाक्य आहे. रांग, ओळ व पातीला कन्नडमध्ये 'साल'(सालम) असे म्हणतात. म्हणजेच पातीला समृद्धी येऊ दे.तर शेतात मालाला बरकत येईल.अशा प्रकारची विनंती शेतकरी पांडवांना व लक्षुमीला करताना दिसतात. फेऱ्या मारल्यानंतर आंबिल व पाणी पिकावर शिंपडले जाते. कोंडलू किंवा मडक्यात तांदूळ व दूध टाकून शेणाच्या वाळलेल्या गौर्यांवर ते दूध तापवले जाते. ते दूध ज्या दिशेने उतू जाईल त्या दिशेने पुढच्या वर्षी चांगला पाऊस पडेल, असा एक संकेत गृहीत धरला जातो. हे संक्रातीला देखील शेतात गेल्यावर करीत असतात. नैवेद्याच्या रूपात आहारातील सर्व पदार्थ कोपीत ठेवले जातात. लक्ष्मीची पूजा करण्याचे कारण म्हणजे लक्ष्मी ही धनाची देवता मानली जाते.परंतु मुळात शेतकऱ्याला कष्ट केल्याशिवाय पर्याय नसतो.शेतावरील लक्ष्मी घरात भरभरून येवू दे. अशी सर्वांची मनातील धारणा असते.

कृषीसंस्कृतीत पांडव पूजेला महत्त्व आहे. ग्रामीण भागात पीक उगवल्यानंतरही पांडवाची पूजा केली जाते. वेळ अमावस्याला कोपीत पाच पांडव व द्रौपदी असे सहा दगड ठेवले जातात. त्या दगडांना पांढरा चुना लावला जातो. पांडवाचा संबंध कदाचित घडलेल्या महाभारताशी जोडला गेला असावा. पांडव हे क्षत्रीय होते.भूमीचे ते रक्षक आहेत. तसेच कौरवांनी पांडवांना सांगितले की सुईच्या टोकाएवढी जमिनीची जागा देखील देणार नाही. त्यासाठी युद्ध झालं.त्यात पांडवाचा विजय झाला.पांडव मातीसाठी लढले म्हणून पांडवाची पूजा करण्याचे कारण असावे. महाभारत व रामायण हे भारतीय संस्कृतीचे दोन डोळे मानले जातात. यातील नायक - नायिकांचा प्रभाव भारतीय माणूस व भारतीय साहित्यावर काही प्रमाणात पडलेला आहे. त्यामुळे पांडवाप्रति असलेल्या श्रद्धेतून पूजा होत असावी. काही ठिकाणी पांडव दगडाची तर काही ठिकाणी मातीचे बनविले जातात. हे घटक निसर्गातील महत्त्वाचे घटक आहेत. ते शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होतात.याशिवाय दुसरा संदर्भ असा देता येईल की, पृथ्वी, आप, तेज,वायू व आकाश ही पंचमहाभूते शेतीच्या संदर्भात नव्हे, तर संपूर्ण मानवी जीवनासाठी व निसर्गातील घटकासाठी उपयुक्त आहेत. याचे प्रतीक म्हणून पांडवाची पूजा केली जात असावी.याबरोबरचं शेतात झाडाला झोका बांधून लहान मुलं मोठी माणसं झोका खेळत असतात. काही जण पतंग उडवितात.एक प्रकारे आनंदमय वातावरण या दिवशी असते. या महिन्यात शिवारात हिवाळ्यामुळे कोवळं ऊन पडलेलं असतं.त्यामुळे उष्णता जाणवत नाही.वेळ अमावस्याच्या स्वयंपाकातील पदार्थाची पूर्वतयारी दोन ते तीन दिवस आधीपासून केली जाते. वेळ अमावस्याच्या पहिल्या दिवसाला 'भाजीपाला दिवस' असे म्हटले जाते. हा एकमेव असा उत्सव,सण आहे की, स्वयंपाक आदल्या दिवशी केला जातो व जेवण दुसऱ्या दिवशी केले जाते. या निमित्त जे काही पदार्थ भोजणासाठी बनविले जातात,त्यात 'भज्जी' नावाच्या भाजीचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.कारण ही भाजी महाराष्ट्रात लातूर जिल्ह्यात विशेष करून बनविले जाते. तुरीच्या शेंगा, हरभऱ्याची भाजी,वाटाणे मिरची,मेथी, शेंगदाणे,कोथिंबीर,कडीपत्ता, कांद्याची पात, आवऱ्याच्याशेंगा,दुधीभोपळा,गाजर,वाळकं, लसूण,कांदे, आलपेस्ट,हिरवी चिंच,तेल,मीठ, हळद,जिरे,मोहरी,आद्रक अशा इतरही अनेक पदार्थापासून 'भज्जी' बनविली जाते. ज्वारीची व बाजरीची भाकरी तसेच पिवळा व कडक भाकरीसोबत भज्जी चविष्ट व स्वादिष्ट लागते. यापैकी बहुतांश पिके व भाजीपाला हिवाळ्यात येत असतात.भज्जीवर तेल टाकले जाते.तेलात लसूण व जिरे याचा समावेश असतो.तसेच भज्जीत दही मिसळून भाकरीसोबत देखील खाल्ली जाते. ज्वारी किंवा बाजरीच्या भाकरीला 'रोडगे' म्हणतात.भज्जी पाच ते सहा दिवस राहते. फ्रिजमध्ये नाही ठेवले तरी ते खराब होत नाही. आयुर्वेदानुसार भज्जी शरीरासाठी पोषक असते.

या दिवशी आहारात 'आंबिल' नावाचा पेय पदार्थ असतो. हा देखील विशेष मेनू होय.ताक,दही, लसूण,कांदा पात,ज्वारी व बाजरीचे पीठ, लिंबू,चिंच व कोथिंबीर यापासून आंबिल बनविली जाते.आदल्या रात्री बनवून माठात/बिंदग्यात ठेवले जाते.आंबट ताकात ज्वारीचे पीठ रात्रभर भिजवून त्यामध्ये मीठ व गरम पाणी टाकून फोडणी दिली जाते. आंबिल कितीही प्राशन केले तरी शरीरास त्रास होत नाही. काही प्रमाणात मात्र झोपेची गुंगी येते. याबरोबरचं स्वयंपाकात गव्हाची खीर बनविली जाते. त्यात खोबर,बडीसोप, गूळ,साखर व इतरही पदार्थ असतात.तसेच गोड पोळी, उंडे, धपाटे तिळाची पोळी, वांग्याचे भरीत,चपाती, तांदळाची खीर, वरण-भात, शेंगदाण्याची चटणी, खिचडी आदी पदार्थही बनविले जातात. या दिवशी आंबट भात देखील बनविला जातो. ज्वारी, ताक, लसून,आद्रक, हिरवी मिरची कोथिंबीर हे सर्व कच्चे साहित्य एकत्र करून आंबट भात बनवतात. हा भात विशेष करून नैवेद्यासाठी वापरला जातो. हे पदार्थ मसाले युक्त नसल्यामुळे पोटदुखी व अपचन यासारखे कोणतेही आजार होत नाहीत. म्हणून अनेक जण चार ते पाच कोपीवर जाऊन जेवण करतात. तेव्हा 'भज्जी जेवा,आंबिल प्या,आज पोट वाढते'असे विनोदाने म्हटले जाते.'बाई बसना काम दिसना' याचा प्रत्यय अशा सणाच्या निमित्ताने स्त्रियांच्या बाबतीत येतो.

गौरी पूजन व वेळ अमावस्या अशा सणांना स्त्रियांना भरपूर कामे करावी लागतात, परंतु उत्साह, आनंद, निष्ठा, श्रद्धा, भावभक्ती यामुळे स्त्रियांना त्याचा थकवा मात्र जाणवत नाही. वेळ अमावस्याच्या दिवशी काही ठिकाणी स्त्रिया आनंदाने गाणे म्हणतात. ती 'स्त्रीगीते' म्हणून लोकसाहित्यात प्रसिद्ध आहेत.आली आली लक्ष्मी/सोन्याच्या पावलानं इळा आमोशाच्या दिसी/कोप चढे 'डोलानं येळ अमोश्याच्या दिशी/जाई जुईचा मांडव तिथे लक्षुमी पांडव/राजे करी दोघेजण'

सायंकाळी टोपलीत लक्षुमीला ठेवून,दिवा लावून तसेच ज्वारीचे धाट ठेवून टोपीलीला शाल पांघरून डोक्यावर घेऊन घराकडे जातात.गावातील मंदिरात टोपलं उतरून दिवा लावला जातो. नंतर स्त्रिया-पुरुष घराकडे जातात. काही भागात संक्रातीला देखील हीच प्रक्रिया केली जाते.

रात्री गावात 'हेंडगा' पेटविला जातो. याचे कारण असे असावे की,दिवाळीच्या पाडव्याला थंडी येते व वेळ अमावस्येला थंडी जाते. थंडी निघून गेली पाहिजे म्हणून 'हेंडगा' पेटविण्याची प्रथा प्रचलित असावी.कदाचित गावातील लोकांमध्ये असलेले दुर्गुण जळून गेले पाहिजेत,अशी समजूत किंवा भावना देखील असावी. थंडीमुळे पिकं कडाडून जातात. हे खरे असले तरी हरभऱ्या सारख्या पिकांना मात्र थंडीची गरज असते. शेतातील थंडी गावात यावी,अशी प्रार्थना केली जात असत.पिकावर व माणसावर रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये, हे देखील वैज्ञानिक सत्य यामागे दडलेले असावे. हेडंगा पेटविणे म्हणजे थंडीला चटका देणे होय. सायंकाळी शेतात दिवटी फिरून लोक घरी जातात. थंडीमुळे पिकाची वाढ चांगल्या प्रकारे होत नाही. थंडी निघून जावी ही सुद्धा यामागची धारणा असावी. येळवस पासून दिवस मोठा होत जातो. त्यामुळे 'येळवशीचा उंडा दिवस झाला धोंडा' या सारख्या म्हणी ग्रामीण भागात प्रचलित आहेत.

एकंदरीत कर्नाटकातील सीमावर्ती महाराष्ट्रात,कर्नाटक व तेलंगणात वेळ अमावस्या हा सण आनंदाने,चैतन्याने,उत्साहाने साजरा केला जातो. एक सामाजिक व धार्मिक सलोखा जपणारा हा सण आहे. कुठल्याही जातीधर्माचा मनात विचार न आणता एकमेकांना भोजनाचे निमंत्रण दिले जाते. या काळात भोजनासाठी लागणारे बहुतांश साहित्य शेतशिवारात असते,त्यामुळे कमी खर्चात हा सण शेतकऱ्याला साजरा करता येतो. शेत-शिवार फुलू दे,शेतकऱ्यांचे आयुष्य सुख समृद्ध होऊ दे, अशी प्रार्थना या दिवशी सगळेच करतात.हा उत्सव म्हणजे शेतकरी नोकरदार व व्यापारी यांची ग्रामीण सहलचं होय. हा उत्सव नैसर्गिक बनण्याची प्रेरणा देते. (माणूस हा आज एकलकोंडा व कृत्रिम झालेला आहे) हा दिवस म्हणजे विशिष्ट अन्नपदार्थांचा व हिरवाईचा अपूर्व सोहळाचं असतो. ऐतिहासिक ग्रंथात या सणाची,उत्सवाची नोंद झाली नाही.परंतु या सणाला शेकडो वर्षांची परंपरा सीमाभागात आहे. हा सण सांस्कृतिक, सामाजिक आणि कौटुंबिकदृष्ट्या श्रीमंत असाचं आहे. अस्सल गावरान वनभोजनासाठी प्रचलित असलेला हा सण मातीशी नाळ जोडणारा आहे. या सणाच्या दिवशी रस्त्यावर, शेतात जणू उत्सवाचे व जत्र्याचे स्वरूप प्राप्त झालेले असते. म्हणून वेळ अमावस्या हा सण असला,तरी याला उत्सव म्हणणे उचित ठरेल. आनंदाने व श्रद्धेने साजरा केला जाणारा हा उत्सव निसर्गाशी मैत्री जपणारा पर्यावरणपूरक असाच आहे.संकलन.

**डॉ. प्रा. सुधीर पंचगल्ले**
श्री माधवराव पाटील महाविद्यालय,
मुरुम ता उमरगा